**इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद**

[(1997) 3 एस.सी.आर. 21 ]

संचालक, प्राथमिक शिक्षण आणि इतर .

विरुध्द

प्रताप कुमार नायक

6 जानेवारी 1997

[ न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ति जी. टी. नानावती ]

प्रशासकीय न्यायाधिकरण - पुनरावलोकनाचा अधिकार - ग्राह्य धरले, न्यायाधिकरण मुख्य आदेशाच्या विरुद्धजाऊ शकत नाही - शैक्षणिक कार्यक्रमांसाठी केंद्र सरकारने प्रायोजित केलेली योजना - सुविधाप्रदात्यांची नियुक्ती - प्रशासकीय न्यायाधिकरणाचे उत्तरवादीच्या प्रकरणाचा नियमानुसार विचार करण्यासाठी अपीलकर्त्यांना दिलेले निर्देश - आवश्यक शैक्षणिक पात्रतेची पूर्तता न केल्यामुळे उत्तरवादीची नियुक्ती केली नाही - उत्तरवादींनी केलेला अवमान आवेदन - उत्तरवादीला नियुक्ती दिली जावी असा न्यायाधिकरणाचा आदेश - न्यायाधिकरणाने पारित केलेल्या आदेशाला आव्हान - न्यायाधिकरणाने मुख्य आदेशाद्वारे जारी निर्देशांच्या विरोधात जाऊन निर्देश देण्यात चूक केली आहे असे मत व्यक्त केले- पुनरावलोकन याचिकेत, न्यायाधिकरण मुख्य आदेशाच्या विरुद्ध जाऊ शकले नसते आणि नवीन निर्देश जारी करू शकले नसते- न्यायाधिकरणाने दिलेला आदेश रद्दबातल केला.

दिवाणी अपील अधिकारीता : दिवाणी अपील क्रमांक 102/1997.

ओरिसा प्रशासकीय न्यायाधिकरण भुवनेश्वर यांनी दि. 15/01/1996 रोजी एम. पी. क्रमांक.3473/1995 मधील पारित केलेल्या निर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी : पी. एन. मिश्रा.

उत्तरदीसाठी : श्रीमती कीर्ती मिश्रा.

न्यायालयाने खालील आदेश पारित केला :

अनुमती मंजूर . आम्ही दोन्ही पक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला आहे.

विशेष परवानगीद्वारे केलेले हे अपील ओरिसा प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.15.1.1996 रोजी एम. पी. क्र. 3473/95 मध्ये दिलेल्या आदेशावरून उद्भवते. प्रारंभी, उत्तरवादीला 6 ते 12 वर्षे वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी केंद्र सरकारने प्रायोजित केलेल्या अनौपचारिक शिक्षण योजना ह्या अनौपचारिक शैक्षणिक कार्याक्रमा अंतर्गत अनौपचारिक सुविधांप्रदता म्हणून नियुक्ती देण्यात अली होती. 10 ऑक्टोबर 1990 रोजी राज्य सरकारने नियमित प्राथमिक शाळेतील शिक्षकची सुविधाप्रदाता म्हणून नियुक्तीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. उक्त मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सुविधाप्रदात्यांनी तीन वर्षांची सेवा पूर्ण केली असावी आणि 31.12.1990 पर्यंत सी. टी. प्रशिक्षण प्राप्त केले असावे. जेव्हा प्रतिवादीने न्यायाधिकरणात ओ. ए. दाखल केला, तेव्हा न्यायाधिकरणाने अपीलकर्त्याला त्याच्या प्रकरणाच्या नियमांनुसार विचार करण्याचे निर्देश दिले होते. यात वाद नाही की 19 मे 1993 रोजीच्या कार्यवाहीनुसार, त्याच्या प्रकरणाचा विचार करण्यात आला आणि तो नियमांनुसार पात्र आढळला नाही. अपीलकर्त्यांनी न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांचे जाणीवपूर्वक उल्लंघन केले आहे असे सांगून उत्तरवादीने न्यायाधिकरणा पुढे अवमान कार्यवाही दाखल केली. आक्षेपित आदेशात असे म्हटले आहे कीः

" अशा परिस्थितीत, दि.11.11.1992 रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी या आदेशाची प्रत मिळाल्याच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत केली जावी. अर्जदाराला त्याच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांप्रमाणे,ज्यांना अशी नियुक्ती देण्यात आली आह, नियुक्ती देण्यात यावी. जर त्याच्या कोणत्याही कनिष्ठ कर्मचाऱ्याला नियुक्ती

देण्यात आली नसेल, तर उत्तरवादी दिनांक २४/०९/१९९२ च्या परिपत्रकानुसार त्याला शिक्षाकर्मी म्हणून काल्पनिक नियुक्ती देऊन प्रचलित सूचनांनुसार कारवाई करतील आणि त्याच्या शिक्षाकर्मी म्हणून नियुक्तीची मानिव तारीख निश्चित केल्यानंतर, त्याला नियमित प्राथमिक शाळेतील शिक्षक म्हणून नियुक्ती देतील, जसे शिक्षाकार्मींच्या बाबतीत केले जात आहे."

त्या आदेशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत ही अपील दाखल करण्यात आली आहे.

आदेशावरून हे स्पष्ट होते की मुख्य आदेशात जारी केलेल्या निर्देशांच्या विरुद्ध निर्देश देण्यात न्यायाधिकरण चुकीचे ठरले आहे. नियमांनुसार त्याच्या प्रकरणाचा विचार करण्यासाठी निर्देश जारी करण्यात आला असल्याने, अनिवार्यपणे, अपीलकर्त्यांनी मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगतपणे प्रतिवादीच्या दाव्याचा विचार करणे आवश्यक होते. अर्थातच उत्तरवादी ने मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेली पात्रता पूर्ण केली नसल्यामुळे, त्याची नियुक्ती केली जाऊ शकली नाही. त्यामुळे त्यांचे प्रकरण फेटाळण्यात आले. हे आक्षेपीत निर्देश पूर्वीच्या प्रसंगी जारी केलेल्या निर्देशांच्या आणि नियमांच्या विरुद्ध आहेत. त्यामुळे पुनर्वलोकन याचिकेत न्यायाधिकरण मुख्य आदेशाच्या विरुद्ध जाऊन नवीन निर्देश जारी करू शकले नसते. जेव्हा आम्ही अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाला उत्तरवादींच्या कोणत्याही कनिष्ठांची नियुक्ती करण्यात आली आहे का हे सांगण्यास सांगितले, तेव्हा असे सांगितल्या गेले की कोणत्याही कनिष्ठांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. प्रतिवादीच्या वतीने हजर असलेल्या विद्वान वकिलाने म्हटले आहे की पात्रता पूर्ण न केलेल्या काही व्यक्तींना नियुक्त केले जात आहे, आणि म्हणूनच ते न्यायाधिकरणाने जारी केलेल्या निर्देशांच्या विरोधात आहे. या युक्तिवादात आम्हाला कोणताही जोर दिसत नाही. मान्य केल्यानुसार, ते उत्तरवादीपेक्षा कनिष्ठ नाहीत आणि कोणत्या परिस्थितीत त्यांची नियुक्ती केली जाते हे आम्हाला माहित

नाही. परंतु अपीलकर्त्यांच्या विद्वान वकिलाने असे म्हटले आहे की बऱ्याच शिक्षकांच्या सेवानिवृत्तीनंतर काही रिक्त जागा निर्माण झाल्या आहेत; शिक्षकांची ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली आहे; उत्तरवादीचे नाव देखील ज्येष्ठतेच्या यादीत समाविष्ट केले आहे; रिक्त जागा निर्माण झाल्यावर उत्तरवादीचा विचार केला जाईल आणि त्यानुसार त्याची नियुक्ती केली जाईल.

वरील परिस्थिती लक्षात घेता, अपील मंजूर करण्यात येते. न्यायाधिकरणाचा आदेश फेटाळण्यात आला आहे. राज्याच्या विद्वान वकिलाने दिलेले विधान नोंदवले जाते. खर्चाबाबत कुठलाही आदेश नाही.

अपील मंजूर करण्यात आली.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x